नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 07/08/2021 (शनिवार)
(सायंकाळ)

---

## चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. मौदा :– दि. 06/08/2021 रोजी रात्री दरम्यान सपोनि श्री सोनेकर हे पो.स्टे. स्टाफ सह पो.स्टे. मौदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असता मौजा गुमथळा हायवे पुलिया समोरील पडसाद फाटयाजवळ एमएच–32/एजे–0985 क्रमांकाच्या टाटा एस गाडी संशयित वाहन मिळुन आले. वाहनामध्ये एम एस सी बी चे लाईन मेन फिर्यादी नामे– सुनिल तोम ठाकरे वय 42 वर्ष रा. गुमथळा ता.कामठी जि. नागपुर यांना बोलावून शहनिशा केली असता त्यांनी कंपनीचा माल असल्याचे सांगितले. गाडीचा चालक आरोपी नामे– 1) उमेद्रंकुमार सवलीया शाहु वय 25 वर्ष 2) विरेंद्र दुल्ला शाहु वय 24 वर्ष दोन्ही रा. कोलबा स्वामी नगर, आंबेडकर मार्ग, नागपुर यांच्या कडून गाडीत असलेला माल डिटिसी केबल बॉक्स व डिस्ट्रीब्युशन बॉक्स किंमती 7,000/–रू. चा माल व एमएच–32/एजे–0985 क्रमांकाच्या टाटा एस गाडी कि. 3,00,000/–रू. असा एकुण 3,07,000/– रू. चा मुद्देमाल घेवुन जातांनी मिळुन आल्याने आरोपीतांना ताब्यात घेवून सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम 379, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा रविन्द्र बकाल 9823168964 हे करीत आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर